महाराष्ट्र शासन महसूल विभाग
तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी कार्यालय, हिंगणा, जि. नागपूर, महाराष्ट्र, पिन 441110
Office of the Tahsildar&Taluka Magistrate, Hingna, Dist-Nagpur (M.S) Pin : 441110
दूरध्वनी: 07104-276134, फॅक्स: -Email ID : tahasildarhingna@gmail.com

माझे कुटुंब माझी जबाबदारी

जा.क्र.म.स/प्रस्तु-1/तह.हिं/कावि-1463./2023 हिंगणा, दिनांक :.05../.06./2023

रामाक्र-45..../ एन.ए.पी-34/प्रस्तु-1/2022-2023
मौजा- सुकळी (गुपचुप), त.सा.क्र.45, तह. हिंगणा
दिनांक. ...05../.06.../2023

परिशिष्ट "ब"

महाराष्ट्र जमीन महसूल संहीता 1966 चे कलम 42-अ मधील तरतुदीन्वये

नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/ विकास परवानगी दिली आहे. अशा जमीनीच्या भोगवटदारास द्यावयाची सनद

ज्याअर्थी, जिल्हा नागपूर, तालुका हिंगणा, **गाव- सुकळी (गुपचुप)** येथील भुमापन क्र./**सर्वे क्रमांक. 29/2, एकुण आराजी 0.88 हे.आर (क्षेत्र 8800.00 चौ.मीटर) पैकी 0.853056 हे.आर (क्षेत्र 8530.56 चौ.मी)** या जमिनीचे भोगवटदार **अर्जदार श्री. प्रशांत मनोहर बोंगीरवार व इतर-1**, रा. अजनी चौक, वर्धा रोड, नागपूर-440015 यांनी **महाराष्ट्र जमिन महसूल संहिता 1966 च्या कलम 42-अ** च्या तरतुदीन्वये **निवासी** अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमिनीचा विकास करण्यास मा. कार्यकारी अभियंता-1, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांचेकडील अंतीम मंजुरी अहवाल क्र.का.अभि./नामप्रविप्रा/8392, दिनांक. 18.05.2023 अन्वये विकास परवानगी प्राप्त केली आहे.

ज्याअर्थी, नियोजन प्राधिकारणाने मंजूर केलेला नकाशा सनदेसोबत सलग्न आहे. मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्राचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

AREA STATEMENT				
1	Area Of Land			
	a) As Per Ownership Document (7/12, Extract)	= 8800.00	SQ.MT.	(0.88 H)
	b) As Per Measurement Sheet	= 8530.56	SQ.MT.	
	c) As Per Site	= 8530.56	SQ.MT.	
2	Deduction For			
	a) Proposed D.P./D.P. Road Widening Area/ Service Road/ Highway Widening	= 0.00	SQ.MT.	
	b) Any D.P. Reservation Area	= 0.00	SQ.MT.	
	c) External Structure Plot	= 0.00	SQ.MT.	
	d) Not in Possession	= 0.00	SQ.MT.	
	Total Deduction (a+b+c+d)	= 0.00	SQ.MT.	
3	Balance Area Of Plot (1-2)	= 8530.56	SQ.MT.	
4	Amenity Space (If Applicable)			
	a) Required	= 0.00	SQ.MT.	
	b) Adjustment of 2(b), if any-	= 0.00		
	c) Proposed	= 0.00	SQ.MT.	

5	Net Plot Area (3-4(c))	= 8530.56	SQ.MT.	
6	Recreational Open Space (If Applicable)			
	a) Required	= 853.06	SQ.MT.	
	b) Proposed	= 853.23	SQ.MT.	
7	Internal Road Area (net plot- (plotable area + open space+ MSEB+ external structure))	= 2288.79	SQ.MT.	
7A	Space for Electric Sub-Station & Waste Water Treatment & Recycling Plant (25.00+35.00)	= 60.00	SQ.MT.	
8	Service Road And High-Way Widening	= 0.00	SQ.MT.	
9	Plotable Area	= 5328.54	SQ.MT.	
10	Pro-Rata Factor For FSI Calculation On Layout Plots (5/9)	= 1.60	SQ.MT.	
11	Area of inclusive housing			
	a) Required	= 0.00	SQ.MT.	
	b) Proposed	= 0.00	SQ.MT.	

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या भोगवटदाराने शासनाने, उक्त संहितेच्या **कलम** 47-**अ** नुसार देय रुपांतर करायची व नमुद **निवासी** अकृषक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम पुढील प्रमाणे निर्धारण करण्यात येते.

उपरोक्त प्रमाणे जागेचे **एकुण आराजी** 0.88 **हे.आर (क्षेत्र** 8800.00 **चौ.मी) पैकी** 0.853056 **हे.आर (क्षेत्र** 8530.56 **चौ.मी) निवासी प्रयोजनार्थ** अकृषक सारा आकारणी करावयाचे **क्षेत्र** 5328.54 **चौ.मीटर (Area Under Layout Plots-** 5328.54 **+ Amenity Space-** 0.00) ला 0.10 **पैसे** प्रति चौ.मीटर याप्रमाणे अकृषक महसूल कर **रु.** 533/-, ग्राम पंचायत सेस अकृषक करा एवढा रु. 533/-, जिल्हा परिषद सेस सारा 7 पट अकृषक कराच्या **रु.** 3731/-, परावर्तीत कर अकृषक साऱ्याचा 5 पट म्हणजेच 2665/- असे **एकुण** 7462/- आकारणी निर्धारित होत असून चालान क्रमांक. **MH002812306202324M**, दिनांक. 30.05.2023 रोजी शासन खजिना दाखल केलेली आहे.

त्याअर्थी, आता उक्त सहिंतेमधील तरतुदीच्या आणि तरतुदीन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुर्दीना आणि खालील शर्तींना अधिन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटदारास सदर नियोजन प्राधिकाऱ्याच्यावर उल्लेखित **विकास/** बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेला **"निवासी"** अकृषिक वापरापोटी उक्त संहितेच्या **कलम** 42-**अ** अन्वये तसेच **नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांनी दिलेल्या अटीं व शर्तींच्या अधीन राहून** हि सनद देण्यात येत आहे.

1) आकारणी : उक्त जमिनीच्या भोगवटदारास उक्त जमिनीच्या संबंधात या आगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणी ऐवजी वर उल्लेखित **विकास**/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून दिनांक. 31 **जुलै**, 2023 रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी **रुपये** 0.10 **प्रति** चौ.मीटर प्रमाणे **रुपये** 533/- या दराने परीगणित होणारी वार्षिक आकारणी देईल अशी उक्त कालावधी संपल्यावर उक्त संहिते अन्वये तहसिलदार कडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल. अशी सुधारीत आकारणी देईल.
2) उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीवर वसुली योग्य असणे सर्व कर, दर आणि उपकर भरील.
3) वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या अभिन्यास नकाशा/ विकास आराखडा वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मंजूरी शिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकारणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराचे क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती असा बदल नियोजन प्राधिकरण कडून मंजूर झाल्यापासून 30 दिवसाच्या आंत तहसिलदार यांना देणे भोगवटदारावर बंधनकारक राहील.
4) सदर जमिनी या नागरी जमीन कमाल धारणा व कोर्ट ऑफ वार्डस् मध्ये बाधित होत असल्यास सदर अकृषक आकारणी रद्द करण्यात येईल.
5) उक्त जमिनीच्या भोगवटदाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास तहसिलदार यास, उक्त संहितेच्या अन्वये तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतूदी अन्वये जी भरण्यास उपयोग करता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमिन भोगवटदार यांच्या वहिवाटीत असण्याचे चालू ठेवता येईल.
6) उक्त जमिनीच्या भोगवटदाराने उपअधिक्षक, भुमि अभिलेख, हिंगणा यांचेकडून मोजणी करुन घेणे बंधनकारक राहिल त्यानंतरच सदर सनद प्रभावी होईल.
7) अभिन्यासातील भुखंडाचा उपयोग फक्त **निवासी** वापराकरिताच करण्यात यावा. तसेच भविष्यात भुखंडाचे विभाजन करु नये.
8) सभोवतालचे मंजूर अभिन्यासातील रस्त्यांशी योग्यरितीने समन्वये साधणे आवश्यक आहे.
9) अभिन्यासाची जागेवरील प्रत्यक्ष आखणी केल्यानंतर अभिन्यासातील राखुन ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ अभिन्यासातील जागेच्या एकुण क्षेत्रफळाच्या 10 % पेक्षा कमी असू नये.
10) अभिन्यासातील जागेत विद्यमान वृक्ष असल्यास अभिन्यास आखणी करताना ते नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवणे बंधनकारक राहील.
11) विषयांकित जमिनीतून विद्युत वाहिनी/ दुरध्वनी वाहिनी जात असल्यास उक्त वाहिनी अभिन्यासातील भुखंडांना बाधित होणार नाही अशा रीतीने संबंधित विभागाच्या अद्यावत नियमानुसार आवश्यक त्या सामाजिक अंतरावर स्थानांतरीत करण्याची जबाबदारी अभिन्यास धारकाची राहील.
12) सदर रेखांकनातील प्रस्तावित बांधकामास दिनांक. 02.12.2021 रोजी मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू राहील.
13) विषयांकित जागेलगत/ जागेतून पाण्याचे स्त्रोत जात असल्यास संबंधित पाटबंधारे/ जलसिंचन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल.
14) पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (Rain Water Harvesting) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.
15) अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठ्याची व्यवस्था जमिन मालक / विकासक यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील. अभिन्यासात निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचा (Black & Grey Water) पुनर्वापर करण्यासाठी (बगीचा, लॅन्ड स्केपिंग, फिशींग, फिशपॉड, रस्ते सफाई, संडास व मुतारीत उपयोगासाठी व धुण्यासाठी) सांडपाणी व सांडपाण्याची प्रक्रिया करुन विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमिन मालक/ विकासक यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील.
16) अभिन्यासातील रस्ते, मल वाहिका, पावसाळी पाण्याची नलीका, जलवाहिनी, स्ट्रीट लाईट इत्यादी योग्य प्रकारे विकसीत करुन ती संबंधित ग्रामपंचायतीस नियमानुसार हस्तांतरीत करावे लागतील.

तसेच विकासकाने ग्रामपंचायतीस हस्तांतरीत झाल्यावर एक वर्षापर्यंत जमिन मालकाला देखभाल दुरुस्तीची कामे करावी लागेल.

17) विषयांकित जागेवर बांधकाम सुरु करण्यापूर्वी बांधकाम नकाशे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कडून मंजूर करुन घ्यावे लागेल.

18) सार्वजनिक मल निस्सारण सयंत्र आणि अनुषंगिक बाबींकरिता लागणारे शुल्काचे अंशदानाचा भरणा करावा लागेल.

19) सार्वजनिक उपयोगाच्या जागेमध्ये वेस्ट वॉटर रिसायकलिंग ट्रिटमेंट प्लॅन्टचे बांधकाम व इलेक्ट्रीक सबस्टेशन लावणे अनिवार्य राहील.

20) रस्त्याच्या बांधकामासाठी तटबंदी (Embankment) 2 मीटर पेक्षा जास्त उंचीचे असल्यास त्याचा भरणा करण्यासाठी फ्लाय ॲश चा वापर करण्यात यावा व तसेच प्राकलन तयार करण्यात यावे.

21) फ्लाय ॲश नी बनवलेली टाईल्स, पेविंग ब्लॉक, विटा, सिमेंट इत्यादी बांधकाम साहित्याचा उपयोग अनिवार्य राहील.

22) अभिन्यासात UDPCR-2020 मधील तरतुद क्र. 13.5 नुसार घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे स्व:खर्चाने बांधकाम करुन त्याची निगा Maintenance राखण्याची जबाबदारी अभिन्यास धारक/ विकासकावर राहील.

23) अभिन्यासास तात्पुरती मंजूरी व आखणी मोजणी "क" प्रत प्राप्त झाल्यानंतर अभिन्यास अंतिम मंजूरीसाठी सादर करण्यासोबत पायाभुत सुविधांचे नकाशे सहाय्यक अभियंता (दक्षिण), नामप्रविप्रा यांचेकडे सादर करावे लागेल.

24) विकास करारनामा प्रमाणे प्रथम टप्यातील 20 टक्के आराजीचे भुखंडकाची (Plotabble Area) यादीसह जागा मुक्त (Release) करण्याकरिता नामप्रविप्रा या विभागास अर्ज सादर करावे लागतील.

25) या अभिन्यासाच्या लगतचे अभिन्यास मंजूरीच्या वेळी त्या अभिन्यास धारकाला आपल्या अभिन्यासातील रस्त्यामधून पोच रस्ता द्यावा लागेल.

26) अभिन्यासात UDPCR-2020 मधील तरतुद क्र. 13.4 नुसार arrangement for grey water treatment recycling & reuse system स्व:खर्चाने विकास करावी लागेल.

27) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सोबत अभिन्यासाच्या विकास करारनामा करण्यापूर्वी व भुखंडके बांधकामासाठी मुक्त झाल्याशिवाय भुखंडक विक्री करता येणार नाही.

28) अभिन्यास नकाशामध्ये नमुद मोजमापे, क्षेत्रफळ इत्यादी परिगणने मध्ये कोणत्याही चुका आढळल्यास त्यासंदर्भाने अभिन्यासास सुधारीत मंजूरी घेणे आवश्यक राहील.

29) भविष्यात जागेबाबत वाद उपस्थित झाल्यास सदरची सनद रद्द समजण्यात यईल.

त्यांची साक्ष म्हणून तहसिलदार, हिंगणा या तहसिलदार अधिकाऱ्याने, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आणि आपल्या पदाची मोहर लावली आहे. आणि अर्जदाराने सुध्दा यावर दिनांक.05../.04../2023 रोजी आपली सही केली आहे.

(भोगवटदाराची सही)

श्री. प्रशांत मनोहर बोंगीरवार

श्री. राहुल अरुणराव उपगन्लावार

(साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या व पदनामे)

अ) .....

श्री. R. T. Mohod

ब) .....

श्री. Nikhil S. Raut

(साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या व पदनामे)

अ) .....

श्री. R. T. Mohod

ब) .....

श्री. Nikhil S. Raut

आम्ही असे जाहिर करतो की, ज्याने सनदेवर स्वत: **अर्जदार श्री. प्रशांत मनोहर बोंगीरवार व इतर-1** यांनी स्वाक्षरी केली आहे. ती **अ व ब** व्यक्ती, तीच व्यक्ती आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्यांची स्वाक्षरी केलेली आहे.

(प्रियदर्शनी बोरकर)
तहसीलदार, हिंगणा

प्रतिलिपी:-

1. **मा. कार्यकारी अभियंता-1, ना.म.प्र.वि.प्रा.** नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
2. **सह दुय्यम निबंधक, हिंगणा** यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित.
3. **उप अधिक्षक, भुमि अभिलेख, हिंगणा** यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित.
4. **तलाठी सा.क्र. 45, मौजा-सुकळी (गुपचुप), ता. हिंगणा** यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित.
5. **वबान शाखा, तहसिल कार्यालय, हिंगणा** यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित.
6. **अर्जदार श्री. प्रशांत मनोहर बोंगीरवार व इतर-1**, रा. अजनी चौक, वर्धा रोड, नागपूर-440015 यांना माहितीस तथा उपरोक्त अटी व शर्तींच्या पूर्तता व अंमलबजावणी करण्यासाठी अग्रेषित.

(प्रियदर्शनी बोरकर)
तहसीलदार, हिंगणा
तहसीलदार, हिंगणा

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

NMRDA
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

क्रमांक : का.अभि./नामप्रविप्रा/ ८३९२ नागपूर, दिनांक : १८/०५/२०२३

प्रति,

तहसिलदार,
हिंगणा, तहसिल कार्यालय,
जि. नागपूर.

विषय :– मौजा **सुकळी (गुपचुप),** खसरा क्रमांक **२९/२, तह. हिंगणा** जि. **नागपूर.** क्षेत्र **०.८८ हे.आर. (८८००.०० चौ.मी.) पैकी ०.८५३०५६ हे.आर. (८५३०.५६ चौ.मी.)** जागा **''निवासी''** प्रयोजनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चा कलम ४५ अन्वये अभिन्यास मंजूरी बाबत व अकृषक सनद मिळण्याबाबत.

संदर्भ :– अर्जदार यांचा दिनांक २१/०३/२०२३ चा अभिन्यास मंजूरीकरीता अर्ज. (Online BPMS Proposal No. 30428)

महोदय,

विषयांकित प्रकरणातील जागा **''निवासी''** वापरार्थ अभिन्यास मंजुरीसाठी उपरोक्त संदर्भांकित पत्र या कार्यालयाला प्राप्त झाले आहे. शासनाने दिनांक ५.०१.२०१८ रोजी मंजुर केलेल्या विकास योजनेनूसार उक्त जागा प्रभाग क्षेत्रात South-B सेक्टर मध्ये **निवासी आर–४** या उपयोगाकरीता प्रस्तावित करण्यात आलेली आहे. योजनेतील तरतुदीनुसार या जागेत प्रस्तावित वापर अनुज्ञेय आहे. संदर्भाधिन पत्रासोबत या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रकरणाच्या अभिन्यासाला **मा. महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण** यांनी दिनांक १४/०५/२०२३ रोजी अभिन्यासाला अकृषक कामी **तात्पुरती** मंजूरी प्रदान केली आहे. अर्जदाराने विकास शुल्क रू. २५,७६,०१०/– चा भरणा दिनांक ०४/०५/२०२३ रोजी केलेला आहे. उक्त जागेला फक्त **''निवासी''** वापराकरीता अकृषक सनद मिळण्याकरीता करण्याकरीता खालील अटींवर शिफारस करण्यात येत आहे.

१. अभिन्यासातील भूखंडाचा उपयोग फक्त **''निवासी''** वापराकरिताच करण्यात यावा. तसेच भूखंडाचे विभाजन करू नये.
२. सभोवतालचे मंजूर अभिन्यासातील रस्त्यांशी योग्यरितीने समन्वय साधणे आवश्यक आहे.
३. अभिन्यासाची जागेवरील प्रत्यक्ष आखणी केल्यानंतर अभिन्यासातील राखून ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ अभिन्यासातील जागेच्या एकूण क्षेत्रफळाच्या १०% पेक्षा कमी असु नये.
४. अभिन्यासातील जागेत काही वृक्ष असल्यास, भूखंड आखतांना ते नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत.
५. विषयांकित जमिनीतून विद्युत वाहिनी/दुरध्वनी वाहिनी जात असल्यास उक्त वाहिनी प्रस्तावाला बाधित होणार नाही अशा रितीने संबंधीत विभागाच्या अद्यावत नियमानुसार आवश्यक त्या सामासिक अंतरावर स्थानांतरीत करावी लागेल.
६. सदर रेखांकनामधील प्रस्तावित बांधकामास दिनांक ०२/१२/२०२१ रोजी मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्हासन नियमावली लागू राहील.
७. विषयांकित जागेलगत/जागेतून पाण्याचे स्त्रोत जात असल्यास संबंधित पाटबंधारे/जलसिंचन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल.
८. पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (Rain Water Harvesting) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.
९. जमीनीचे मालकी हक्काबाबत महसूल विभागाचे स्तरावर खात्री करून घेणे आवश्यक राहील.

पत्ता : स्टेशन रोड, सदर नागपूर –४४० ००१ | फोन : ०७१२–२५३३२०२ | फॅक्स : ०७१२–२५३१०७९ | इ–मेल : nmrda@hotmail.com

१०. अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठयाची व्यवस्था जमिन मालक/विकासक यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील. अभिन्यासात निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचा (*Black & Grey Water*) पुनर्वापर करण्यासाठी (बगीचा, लॅन्ड स्केपिंग, फिशींग, फिश पॉड, रस्ते सफाई, संडास व मुतारीत उपयोगासाठी व धुण्यासाठी) सांडपाणी व सांडपाण्याची प्रक्रीया करून विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमिन मालक/विकासक यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील.

११. अभिन्यासातील रस्ते, मलवाहिका, पावसाळी पाण्याची नलिका, जल वाहिनी, स्ट्रीट लाईट इत्यादि योग्य प्रकारे विकसीत करून ती संबंधित ग्रामपंचायतीस नियमानुसार हस्तांतरीत करावे लागतील. तसेच विकास कामे ग्रामपंचायतीस हस्तांतरित झाल्यावर एक वर्षा पर्यन्त जमीन मालकाला देखभाल दुरूस्तीची कामे करावी लागेल. तद्नंतरच सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.

१२. विषयांकित जागेवर बांधकाम सुरू करण्यापूर्वी बांधकाम नकाशे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कडून मंजूर करून घ्यावे लागेल.

१३. अभिन्यासाला अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यावर नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासोबत विकास करारनामा करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

१४. सार्वजनिक मल निस्सारण सयंत्र आणि अनुषंगिक बाबींकरीता लागणारे शुल्काचे अंशदानाचा भरणा करावा लागेल.

१५. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ (MRTP Act 1966) चे कलम १२४(ब) नूसार उक्त जागेच्या प्रचलित शिघ्रगणन मुल्य दराने येणारे एकुण मुल्याच्या ०.५ टक्के मुल्य जमीन विकास फंड (Land Development Fund) करिता अर्जदार / विकासकाकडून घ्यावे लागेल. अर्जदाराने रू. २,१२,०८०/— दिनांक ०६/०५/२०२३ रोजी भरणा केलेला आहे.

१६. रस्त्याच्या बांधकामासाठी तटबंदी (Embankment) २ मीटर पेक्षा जास्त उंचीचे असल्यास त्याचा भरणा करण्यासाठी फ्लाय ॲश चा वापर करण्यात यावा व तसेच प्राकलन तयार करण्यात यावे.

१७. फ्लाय ॲश नी बनवलेली टाईल्स, पेविंग ब्लॉक, विटा, सिमेंट इ. बांधकाम साहित्याचा उपयोग अनिवार्य राहील.

१८. अभिन्यासात प्रस्तावित जागेमध्ये वेस्ट वॉटर रिसायकलिंग ट्रिटमेंट प्लॅन्टचे बांधकाम व इलेक्ट्रीक सबस्टेशन लावणे अनिवार्य राहील.

१९. अभिन्यासात UDCPR-2020 मधील तरतूद १३.५ नूसार घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे स्व:खर्चाने बांधकाम करून त्याची निगा Maintenance राखण्याची जवाबदारी अभिन्यास धारक/विकासकावर राहील.

२०. अभिन्यासास तात्पुरती मंजूरी व आखणी मोजणी 'क' प्रत प्राप्त झाल्यानंतर अभिन्यास अंतिम मंजूरीसाठी सादर करण्यासोबत पायाभुत सुविधांचे नकाशे सहा. अभियंता (दक्षिण), विभागीय कार्यालयात सादर करावे लागेल.

२१ विकास करारनामा प्रमाणे प्रथम टप्पयातील २० टक्के आराजीचे भुखंडकांची (Plotabble Area) यादीसह जागा मुक्त (Release) करण्याकरीता या विभागास अर्ज सादर करावे.

२२. या अभिन्यासाच्या लगतचे अभिन्यास मंजूरीच्या वेळी त्या अभिन्यास धारकाला आपल्या अभिन्यासातील रस्त्यामधून पोच रस्ता द्यावा लागेल.

२३. विकासकास एकूण विकास शुल्काचे ५ टक्के अनामत रक्कम भरणा करावा लागेल व ५ टक्के पर्यवेक्षण रक्कम रू. ३,८५,७४८/— दिनांक ०६/०५/२०२३ रोजी भरणा केलेला आहे.

२४. विकासकाने रू. ३,००,०००/— प्रती हे. आर. प्रमाणे सिवेज डिस्पोजल स्किम शुल्क रू. २,६४,०००/— दिनांक ०६/०५/२०२३ रोजी भरणा केलेला आहे.

२५. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सोबत अभिन्यासाच्या विकास करारनामा करण्यापुर्वी व भुखंडके बांधकामासाठी मुक्त झाल्याशिवाय भुखंडक विक्री करता येणार नाही.

२६. अभिन्यासात UDCPR-2020 मधील तरतूद क्र. १३.४ नूसार arrangement for grey water treatment, recycling & reuse system स्वखर्चाने विकास करावी लागेल.

२७. उक्त जागा शासनाच्या दि. २०/०२/२०१५ रोजी (Draft DevelopmentPlan) नागपूर महानगर क्षेत्राकरीता प्रसिध्द प्रारूप विकास योजनेनुसार निवासी R-4 उपयोगाकरीता प्रस्तावित आहे. नागपूर महानगर प्रदेशाकरीता विकास योजना आराखडा,महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ कलम ३१(१) अन्वयेशासनाने दि. ०५/०१/२०१८ रोजी विकास आराखडा मंजुर केलेला असुन उक्त जागानिवासी R-4 उपयोगाकरीता दर्शविलेली

आहे. मंजुर विकास योजनेतील परीशिष्ट 'अ'मधिल मंजुर सारभुत बदल मधील Sanctioned Modification अनुक्रमांक १-(SM-1) नुसार R-3 व R-4 जमीनी करीता **Infrastructure Cost** रू. २८,५१,२००/– चा भरणा अर्जदाराने दिनांक ०६/०५/२०२३ रोजी केलेला आहे.

अभिन्यासाची दोन प्रत या कार्यालयामार्फत यासह पाठविण्यात येत आहेत. कृपया उक्त जागेची अकृषक कर निर्धारण प्राप्त झाल्यानंतर अकृषक आदेशाची प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी, ही विनंती.

सहपत्र : अभिन्यास नकाशा दोन प्रत.

ख.क्र. २९/२, मौजा – सुकळी (गुपचुप), तह. हिंगणा

–sd–

कार्यकारी अभियंता–१

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

प्रतिलिपी:–

१) श्री प्रशांत मनोहरराव बोंगीरवार व इतर १, अजनी चौक, वर्धा रोड, नागपूर–४४००१५

२) कार्यकारी अभियंता –२, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांना माहितीस सादर.

३) सहा. अभियंता – १ (पश्चिम), नामप्रविप्रा, अंबाझरी रोड, नागपूर यांना पूढील कार्यवाहीस अग्रेषित.

कार्यकारी अभियंता–१

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण